---

# युवारंग २०२३

जळगाव. दि.१० (प्रतिनिधी) लोकसंगीत, समुह नृत्य, शास्त्रीय नृत्य, नाटय संगीत व सुगम संगीत, ललितकला यामधून फुललेल्या कलाविष्कारांनी युवारंग युवक महोत्सवातील स्पर्धेचा शेवटचा दिवस संस्मरणीय बनला. आता कलावंत विद्यार्थ्यांचे पारितोषिकांकडे लक्ष लागले आहे. दरम्यान उद्या दि.११ ऑक्टोबर रोजी लोकप्रिय अभिनेत्री सुरभी हांडे हिच्या उपस्थितीत पारितोषिक वितरणाने महोत्सवाचा समारोप होणार आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि केसीई संस्थेचे मुळजी जेठा महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाला ८ ऑक्टोबर पासून प्रारंभ झाला आहे. मंगळवारी सर्व कला प्रकारांच्या स्पर्धा उशिरा संपल्या. रंगमंच क्र.१ कवयित्री बहिणाबाई चौधरी खुल्या रंगमंचावर सकाळच्या सत्रात लोकसंगीताच्या स्पर्धा झाल्या. या कला प्रकारात बासरी, ताल, मृदंग, ढोल, ताशे, घुंगरु, डमरु, ढोलकी, लेझीम, दिमडी, डमरु, पखवाज, शंख ही पारंपरिक वाद्ये कौशल्याने वाजवून व ताल व लय साधत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सादरीकरण केले. लोप पावत चाललेली लोककला ही भारतीय संस्कृतीचा आणि सामाजिक ऐक्याचा आधार असल्यायने या लोककलांचा वारसा टिकवून ठेवण्याचा संदेश विद्यार्थी कलावंतानी आपल्या सादरीकरणातून दिला. या स्पर्धेत ५ संघांनी भाग घेतला.

याच रंगमंचावर दुपार सत्रात भारतीय समुह नृत्य या कला प्रकारात आदिवासी कला, आदिवासी विवाह नृत्य, घोंगडी नृत्य, कोळीनृत्य, धनगरनृत्य, खंडोबा नृत्य, गोंधळ, आंध्र प्रदेशातील तपेटागुल्लू, ओडीसी नृत्य, शेतकरी नृत्य आदी नृत्यप्रकार उत्कृष्टपणे सादर करुन प्रेक्षकांना पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविले. वेशभूषा, केशभूषा, देहबोली हे सर्व काही भारावून टाकणारे होते. टाळयांच्या गडगडात प्रेक्षकांनी भरभरुन दाद दिली. या स्पर्धेत २३ संघांनी सहभागी होत आपली कला सादर केली.

रंगमंच क्र.२ पद्मश्री ना.धो.महानोर सभागृहात भारतीय शास्त्रीय नृत्य स्पर्धा झाली. यामध्ये भरत नाट्यम, कत्थक, कुचीपुडी, हे नृत्य सादर करण्यात आले. सुरेख वेशभूषा आणि चेहऱ्यावरील हाव भाव या अदांना उपस्थितांनी दाद दिली. या कलाप्रकारात १४ संघांनी सहभाग नोंदविला.

रंगमंच क्रमांक ३ पूज्य सानेगुरुजी रंगमंचावर काल अपूर्ण राहिलेली वादविवाद स्पर्धा आज घेण्यात आली. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा प्रभाव आहे / नाही हा विषय देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी अनुकुल व प्रतिकुल बाजू मांडून उपस्थितांची दाद घेतली.

रंगमंच क्र.४ भारतरत्न लता मंगेशकर रंगमंचावर भारतीय नाट्य संगीत आणि भारतीय सुगम संगीत स्पर्धा झाली. नाटयगीतात ७ स्पर्धकांनी तर सुगम संगीतात ३४ स्पर्धकांनी भाग घेतला. आदी विस्मृतीत गेलेली नाटय गीते आणि मराठीतील लोकप्रिय सुगम गीते सादर करुन अनोखा मिलाप सभागृहात घडवून आणला. कानडा राजा पंढरीचा, धरीला पंढरीचा चोर, या सुरांनो चंद्र व्हा, नारायणा रमा रमणा, ऐसा

लगता है, दिवस हे धुंद, भरे मनात सुंदरा, सांज ये गोकुळी आदी गीते ताकदीने सादर केली. एकीकडे नाटय गीतांची आवड कमी होत असतांना या तरूणपिढीने नाटयगीताशी असलेली नाळ दाखवून दिली.

रंगमंच क्र.५ वरील कला महर्षि केकी मूस सभागृहात पोस्टर मेकींग स्पर्धेने सुरुवात झाली. या स्पर्धेत ५६ स्पर्धकांनी भाग घेतला. माझा खान्देश असा विषय परीक्षकांनी दिला होता. पोस्टर्स व्दारे स्पर्धकांनी हुबेहुब वरण बट्टी, जळगाव शहर, विद्यापीठ परीसर, केळी, कापूस, बहिणाबाईंचे जीवन, सातपुडा परीसर, कानबाई, खान्देशातील वीर, खान्देशातील सण आदी परंपरेचे दर्शन आपल्या कुंचल्यातून घडविले. याशिवाय मु.जे.महाविद्यालयातील स्वामी विवेकानंद भवन, एकलव्य क्रीडा संकुल, आदी रेखाटले होते.

याच सभागृहात रांगोळी या कला प्रकारातील स्पर्धेसाठी भारतीय सण हा विषय देण्यात आला होता. एकूण ७१ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. अडीच तासाच्या वेळेत स्पर्धकांनी रांगाळी रेखाटून गुढीपाडवा, गणेशोत्सव, दिवाळी, होळी, पोळा, तुळशी विवाह, नवरात्री, मकर संक्रांत, आषाढी एकादशी, महाशिवरात्री, नाताळ, कृष्ण्जन्माष्टमी, वटपोर्णिमा, अक्षय्य तृतीया, रक्षाबंधन, गरबा, ईद आदी पारंपरिक सणांचा सुंदर आविष्कार घडविला.

याच सभागृहात फोटोग्राफीची अंतिम फेरी झाली. यामध्ये निसर्ग हा विषय देण्यात आला होता. १० स्पर्धकांनी अंतिम फेरीत प्रवेश केला होता. यात विद्यार्थ्यांनी निसर्गाची किमया आपल्या कॅमेऱ्यात कैद केली. सकाळी इंस्टॉलेशन ही स्पर्धा झाली. टाकाऊतून टिकावू हा संदेश दिला. स्पर्धकांना मुक्ताविष्काराचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी परीसरात असलेल्या टाकाऊ वस्तूंमधून देखण्या कलाकृती तयार केल्या. यामध्ये भारताचे नवे संसद भवन, आदर्श जिल्हा परीषद शाळा, आदर्श गाव, प्लॅस्टीक मुक्त गाव, चांद्रयान, इस्त्रो, पृथ्वी वाचवा, निसर्ग जपा आदी विषय साकारले.

युवारंगाचे कार्याध्यक्ष व व्यवस्थापन परीषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, व्यवस्थापन परीषद सदस्य, युवारंगाचे स्वागताध्यक्ष व केसीई संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार बेंडाळे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.सुरेखा पालवे, ॲड. अमोल पाटील, नितीन झाल्टे, डॉ. पवित्रा पाटील यांनी विद्यार्थी व्यवस्थेच्या ठिकाणी व विविध रंगमंचास भेट दिली. यावेळी अधिसभा सदस्य दीपक पाटील, डॉ.मंदा गावीत, प्रा. जयवंत मगर, डॉ. संदीप नेरकर, दिनेश चव्हाण, प्राचार्य संजय भारंबे व विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. जयेंद्र लेकूरवाळे, डॉ.जुगलकीशोर दुबे, डॉ. मनोज महाजन, डॉ.विजय लोहार हे उपस्थित होते. तसेच ॲड. संदीप पाटील यांनीही महाविद्यालयाला भेट दिली.

**उद्या** सकाळी पारितोषिक वितरण

उद्या बुधवार दि.११ ऑक्टोबर रोजी स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सकाळी १० वाजता होणार आहे. सुप्रसिध्द सिने कलावंत सुरभी हांडे हिच्या हस्ते पारितोषिके दिली जाणार असून प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे अध्यक्षस्थानी असतील. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार शिरीष चौधरी, आमदार सुरेश भोळे राहणार असून कुलसचिव डॉ.विनोद पाटील, केसीई संस्थेचे पदाधिकारी ॲड. प्रवीणचंद्र जंगले, ज्ञानदेव पाटील तसेच युवारंगचे कार्याध्यक्ष तथा व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे, स्वागताध्यक्ष भालचंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल.

---

**जाक्र कबचौउमवि**/१६/**ईमेल**/२०२३ **दिनांक १० ऑक्टोबर** २०२३

प्रति
मासंपादक

कृपया वरील बातमीप्रसिध्दीस देऊन सहकार्य करावे ही विनंती

आपलाविश्वासू
डॉ सुनील पाटील
जनसंपर्क अधिकारी